# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

## प्रेसनोट क्र.१० दिनांक.२९.०१.२०२१

## तलासरी पोलीस ठाणे यांचेकडुन रेती वाहतुक करणा-या आरोपीतावर कारवाई

दिनांक.२७/०१/२०२१ रोजी २२.३० वा.चे सुमारास तलासरी पोलीस ठाणे हद्दीत आर.टी.ओ. दापचरी ता.डहाणु, जि.पालघर येथे यातील आरोपीत नं.१ ते ४ यांनी त्यांचे ताब्यातील टाटा कंपनीचे ट्रक क्र. एम.एच. ०४ एच.वाय.८२६२ व ट्रक क्र. एम.एच./४७ वाय/६७५५ या मधुन महाराष्ट्र शासन निर्णय क्र.गौखनी/१०/०६१५/ प्र.क्र.२५९/ख दिनांक ०३/०१/२०१८ मधील प्रस्तावना क्रमांक १९ या शासन निर्णया नुसार गौणखनिज वाहतुकीस बंदी असताना व शासनाचा कोणताही परवाना नसताना संगणमताने चोरटया पध्दतीने रेती वाहतुक करताना मिळुन आले. सदरचे आरोपीत यांचे ताब्यातुन १)२०,०००००/- रुपये किंमतीचे दोन टाटा कंपनीचे ट्रक क्र. एम.एच.०४ एच.वाय.८२६२ व ट्रक क्र.एम.एच.४७ वाय.६७५५ या क्रमांकाचे समोरुन पांढ-या रंगाचे दोन ट्रक २)३६,०००/-रु किंमतीची १२ ब्रास रेती असा एकुण २०,३६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन तलासरी पोलीस ठाणे गु.रजि.क्र. I ०१/२०२१ भा.द.वि.स.क ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास चालु आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दि.२८/०१/२०२१ रोजी ०४.०७ वा. अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस निरीक्षक श्री.अजय वसावे, प्रभारी अधिकारी तलासरी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तलासरी पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner